# 'द न्यूज बिज टाईम्स'

दि. ३/१/२०२६ | पिंपरी, महाराष्ट्र. | thenew2biz@gmail.com | वर्ष - दुसरे | डिजीटल आवृत्ती


# शिक्षकांना सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन; आर्थिक फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन

पिंपरी, प्रतिनिधी : डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यासोबत वाढणाऱ्या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने सी. के. गोयल आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज येथे डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपरीच्या क्विक हिल फौंडेशन सायबर वॉरियर क्लब यांच्या वतीने सायबर सुरक्षा जनजागृती सत्र घेण्यात आले. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत तसेच यावर्षीच्या माय डाटा, माय रिस्पॉन्सिबीलिटी या संकल्पनेनुसार आयोजित या सत्रात २० हून अधिक शिक्षकांनी सहभाग घेतला.

सत्रादरम्यान सायबर वॉरियर्स सोहम सोनावणे आणि सिद्धलक्ष्मी पाल यांनी उपस्थित शिक्षकांशी संवाद साधत आर्थिक फसवणुकीचे विविध प्रकार, त्यांची कार्यपद्धती आणि त्यापासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक खबरदारी याबाबत मार्गदर्शन केले. ऑनलाईन स्कॅम, ओटीपी फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षितता, सोशल मीडिया अकाउंट हॅक, तसेच बनावट



सोशल मीडिया प्रोफाइल यांसारख्या विषयांची उदाहरणांसह माहिती देण्यात आली.

आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तींना ओटीपी, पासवर्ड, पिन किंवा बँकविषयक गोपनीय माहिती न देणे, संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे तसेच सोशल मीडिया खात्यांची सुरक्षितता आणि वैयक्तिक माहितीच्या संरक्षणाबाबत आवश्यक दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे देत दैनंदिन डिजिटल व्यवहारांमध्ये कोणत्या बाबींची काळजी घ्यावी, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सत्रादरम्यान उपस्थितांनी सायबर सुरक्षा शपथ घेतली. सत्रानंतर शिक्षकांनी हा उपक्रम अत्यंत माहितीपूर्ण आणि उपयुक्त असल्याचे सांगितले. सायबर गुन्हा घडल्यास नॅशनल सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधण्याबरोबरच नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टल वर तक्रार नोंदविण्याबाबतही माहिती देण्यात आली.

या उपक्रमाला पल्लवी जगताप यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. क्लबचे महाविद्यालयीन समन्वयक प्रा. सत्यवान कुंजीर यांच्या समन्वयातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिक्षकांमध्ये सायबर फसवणुकीबाबत जागरूकता वाढवून सुरक्षित डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल समाजनिर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरला.